# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/ 9060 /2020-21 दि. 94/90 /2020

संगणक विभाग
आवक क्र: 042
दिनांक : 94/90/20

प्रति,
प्र.सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/1079/2020-21, दि.15/10/2020 रोजीची जाहीर सुचना.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लेखापरीक्षण, आस्थापना व शिक्षण विभागाकरीता सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांमधुन सेवाकरार पध्दतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन संदर्भिय जाहिरातीनुसार अर्ज मागविण्यात आलेले आहे.

सदरची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

24.10.20

(सुनिल यादव)
आस्थापना अधीक्षक
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत- जाहिर सुचनेची प्रत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/१०७९ /2020-21 दि.१५/१० /2020

<u>शासनाकडील सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी सेवाकरार पध्दतीने नियुक्त करणेबाबत..</u>

## // जाहिर सुचना //

मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका हे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील लेखापरीक्षण, आस्थापना व शिक्षण विभागाकरीता शासनाकडील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांमधुन सेवाकरार पध्दतीने लेखापरीक्षण अधिकारी पदासाठी इच्छुक असलेल्या तसेच अर्हता पुर्ण करणा-या पात्र उमेदवाराकडुन खालील अटी व शर्तीवर दि.29/10/2020 रोजी साय.05.00 वाजेपर्यंत आवक जावक विभाग, मिरा भाईदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, स्व.इंदिरा गांधी भवन, तळ मजला, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे टपालाव्दारे किंवा स्वहस्ते अर्ज मागविण्यात येत आहेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले अर्जाचे लखोटे उघडण्यात येणार नाहीत. अर्ज करावयाच्या पाकीटावर “लेखापरीक्षण अधिकारी” पदाचे नाव ठळक अक्षरात नमुद करावे.

<u>उपलब्ध पद संख्या-</u>

| अ.क्र | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| १ | लेखापरीक्षण अधिकारी (सेवा करार पध्दतीने) | 10 | अ) लेखा अथवा लेखापरीक्षक पदावर काम केल्याचा किमान 10 वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>ब) लेखापाल / सहा.लेखाधिकारी / सहा.लेखापरीक्षा अधिकारी अथवा यापेक्षा उच्च पदावरील कामाच्या अनुभवास प्राधान्य. |

<u>अटी व शर्ती-</u>

1) उमेदवार शासन सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा.
2) उमेदवार लेखा अथवा लेखापरीक्षण विभागामधील पदावर किमान 10 वर्षाचा अनुभव असावा.
3) सा.प्र.वि शासन निर्णय क्र. संकिर्ण-2715/प्र.क्र.100/13 दि.17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
4) सेवानिवृत्त लेखापरीक्षण अधिकारी यांची मासिक पारिश्रमिक व भत्ते दि.17/12/2016 रोजीच्या शासन निर्णयातील सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे निश्चित करण्यात येईल. एकदा निश्चित केलेल्या वेतनामध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही.
5) करार पध्दतीने नेमणुकीकरीता अर्ज करते वेळी सेवानिवृत्त अधिका-याचे वय 65 वर्षा पेक्षा अधिक नसावे.

6) सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त 01 वर्षासाठी देण्यात येईल. आवश्यकता असल्यास अशा नियुक्तीचे वाढीव कालावधीकरीता नुतनीकरण करता येईल. परंतु एकुण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

7) नियुक्तीच्या कालावधीमध्ये सोपविलेले लेखापरीक्षणासाठी काम पुर्ण करुन लेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची जवाबदारी संबंधित उमेदवाराची राहील व तसे हमी पत्र/बंध पत्र घेण्यात येईल.

8) करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात / मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत / सामावुन घेण्याबाबतचा अधिकार/ हक्क नसेल.

9) अतिरीक्त अर्हता- बी.कॉम/ एम.कॉम / एम.बी.ए (फायनांस) / शासनाकडील वित्त व लेखा संवर्गातील अधिकारी /लेखापरीक्षण विभागातील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य दिले जाईल.

10) करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुदध विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा चालु प्रस्तावित नसावी किवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

11) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परीस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिका-यांच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

12) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे सेवा करार तत्वावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे.

13) प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रीया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

(मा. आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(अजित मुठे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका